# महिला व बालविकास विभाग
## जिल्हा परिषद,नांदेड

दुरध्वनी व फॅक्स:02462-232561-email:- dyceoicdsnanded@yahoo.com


जाक्र/जिपनां/मबाविवि/आस्था-1/404 /2022. दि. 05 /05 /2022.

**अंगणवाडी कामकाज वेळ तात्काळ अंमलबजावणी**

प्रति,

बाल विकास प्रकल्प अधिकारी (सर्व)
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
प्रकल्प जि.नांदेड.

**विषय:-राज्यातील वाढत्या तापमानामुळे अंगणवाडी भरविण्याच्या वेळेत बदल करणे बाबत.**

**संदर्भ:-**१.मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र
जा.क्र.एबाविसेयो/नमुंबई/का-७/अंगणवाडी/२०२२/१७३६, दिनांक-०५/०५/२०२२.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र.१ अन्वये आपणास कळविण्यात येते की, मागील काही दिवसांपासून राज्यातील तापमानामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या उष्णतेचा अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये याकरिता दिनांक-०६.०५.२०२२ पासून दिनांक-१५ जून २०२२ पर्यंत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अंगणवाडी स्तरावरील कामकाजाची वेळ खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कामकाजाची वेळ |
|---|---|---|
| १ | अंगणवाडी स्तरावरील योजनेच्या कामकाजाची वेळ | सकाळी ७.३० पासून दुपारी १२.३० पर्यंत. |
| २ | अंगणवाडीतील बालकांना प्रत्यक्ष अंगणवाडीत बोलावणे, पूर्व शालेय शिक्षण देणे व पूरक पोषण आहार देणे. | सकाळी ८.०० ते १०.३० पर्यंत. |

**सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या कालावधीत अंगणवाडी सेविका यांनी योजनेची नियमित कामे (उदा.गृहभेट, सर्वेक्षण, नोंदणी, अभिलेख पूर्ण करणे व आयुक्तालयाने सूचित केलेली इ.) करावती.**

वरील वेळापत्रकाप्रमाणे अंगणवाडी स्तरावरील कामकाज करण्याकरिता आपले अधिनस्त मुख्यसेविका/पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका यांना आजच सूचना निर्गमित करण्यात याव्यात. **दिनांक-१६ जून २०२२ पासून पुढे पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणे कामकाज करण्यात यावे.** व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

स्वाक्षरीत/-
(आर.पी.काळम)
**जिल्हा कार्यक्रम अधिकारी**
**(महिला व बाल विकास विभाग)**
**जिल्हा परिषद नांदेड**

**प्रतिलिपी,**

१. मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद,कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.

(आर.पी.काळम)
**जिल्हा कार्यक्रम अधिकारी**
**(महिला व बाल विकास विभाग)**
**जिल्हा परिषद नांदेड**